मुंबई शहर जिल्ह्यातील शासकीय भाडेपट्टयाने दिलेल्या मिळकतीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका हस्तांतरणासंदर्भातील अटी व शर्तींमध्ये बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक :- जमीन-२५१६/प्र.क्र.७/ज-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :-०७.०३.२०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एलसीएस-१०८३/१८८२/प्र.क्र.-२२२/ग-४, दि.१२/५/१९८३

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दि.९/७/१९९९

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०१७/ प्र.क्र.१२७/ज-१, दि.७/७/२०१७

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०१७/ प्र.क्र.१२७/ज-१, दि.४/५/२०१८

५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे पत्र क्र.सीएसएलआर/मशा-२/टे-३/सद.हस्तां./ संकिर्ण/ २०१८/१५४८८, दि.४/८/२०१८

<u>प्रस्तावना-</u>

वरळी महसूल विभागातील शुभदा व सुखदा सहकारी गृहनिर्माण संस्थांना जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाकडून आदेश क्र.मशा-२/टे-३/एलएनडी- No.३११३, दिनांक १७/१०/१९९६ व आदेश क्र.मशा-२/ टे-३/एलएनडी- No.३११२, दि.२३.१०.१९९६ रोजी देण्यात देण्यात आलेल्या जमीन प्रदान आदेशामध्ये शासन निर्णय क्र.एलसीएस-१०८३/१८८२/प्र.क्र.-२२२/ग-४, दि.१२/५/१९८३ मध्ये नमूद असलेली "घराच्या किंवा फ्लॅटच्या हस्तांतरणास परवानगी देताना संस्थेने मान्यताप्राप्त सदस्यांकडून आकारलेली त्या घराची / सदनिकेची किंमत व नवीन सदस्यास ते घर/सदनिका ज्या किंमतीला सदनिका हस्तांतरीत करण्यात येणार असेल ती किंमत यामधील फरकाच्या ५० टक्के इतकी रक्कम संस्थेकडून वसुल करण्याचा शासनाचा हक्क राहिल." अशी अट नमूद आहे. हा दिनांक १२/५/१९८३ रोजीचा शासन निर्णय तद्नंतरच्या शासन निर्णय क्र.एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दिनांक ९/७/१९९९ अन्वये अधिक्रमित करण्यात आलेला आहे.

शासनाने सवलतीच्या दराने शासकीय जमीन प्रदान करण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका हस्तांतरणास परवानगी देताना आकारावयाच्या हस्तांतरण आकाराबाबत व विनापरवानगी झालेले हस्तांतरण नियमित करताना आकारावयाच्या हस्तांतरण आकार व दंडाच्या रकमेच्या आकारणीबाबत शासन निर्णय क्र. जमीन-२०१७/ प्र.क्र.१२७/ज-१, दिनांक ७/७/२०१७ व समक्रमांकीत शासन निर्णय दिनांक ४/५/२०१८ अन्वये धोरण निश्चित केले आहे.

मुंबई शहर जिल्ह्यामध्ये सुखदा व शुभदा सहकारी गृहनिर्माण संस्थांबरोबरच सवलतीच्या दराने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील अन्य सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका हस्तांतरणास परवानगी देतांना आकारावयाच्या हस्तांतरण आकाराबाबत एकवाक्यता असणे आवश्यक होते. तसेच केवळ सुखदा व शुभदा याच सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका हस्तांतरण करण्यास परवानगी देताना या

संस्थांच्या जमीन प्रदान आदेशातील तरतुदीनुसार सदनिकेच्या विक्रीच्या किंमतीमधील फरकाच्या ५०% रक्कम वसूल करणे संयुक्तिक होणार नाही व सदर संस्थांकडून शासन निर्णय क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१,दिनांक ७/७/२०१७ व समक्रमांकाच्या दि.४/५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार हस्तांतरण शुल्क घेणे योग्य होईल ही धारणा पक्की करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.४/८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. त्यानुषंगाने मुंबई शहर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका हस्तांतरीत करण्यास परवानगी देताना जमिन प्रदान आदेशातील तरतुदी प्रमाणे अनर्जित उत्पन्नातील ५०% हिस्सा वसूल करावा किंवा शासन निर्णय क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१,दिनांक ७/७/२०१७ व समक्रमांकाच्या दि.४/५/२०१८ मधील शासन निर्णयातील तरतुदींप्रमाणे हस्तांतरण आकार वसूल करण्यात यावा याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाने दि.२४.२.२०१९ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

वरळी महसूल विभागातील सुखदा व शुभदा सहकारी गृहनिर्माण संस्थांबरोबरच मुंबई शहरात सवलतीच्या दराने शासकीय जमीन प्रदान करण्यात आलेल्या उर्वरीत सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका हस्तांतरणासंदर्भात लागू असलेली "घराच्या किंवा फ्लॅटच्या हस्तांतरणास परवानगी देताना संस्थेने मान्यताप्राप्त सदस्यांकडून आकारलेली त्या घराची/सदनिकेची किंमत व नवीन सदस्यास ते घर/सदनिका ज्या किंमतीला हस्तांतरीत करण्यात येणार असेल ती किंमत यामधील फरकाच्या ५० टक्के इतकी रक्कम संस्थेकडून वसुल करण्याचा शासनाचा हक्क राहिल." ही अट वगळून सुखदा व शुभदा सहकारी गृहनिर्माण संस्थांबरोबरच मुंबई शहरात सवलतीच्या दराने शासकीय जमीन प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका हस्तांतरणासाठी शासन निर्णय क्र.जमीन/२०१७-प्र.क्र/१२७.ज१-, दिनांक ७/७/२०१७ व समक्रमांकित शासन निर्णय दिनांक ४/५/२०१८ लागू करण्यास शासनमान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०७१२५२४८०११९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c61495ae8b4592f8dcc5b8a851a8, serialNumber=aa3985b8c1804418574f1872e9908934b35fbd2a705aaf56c57fbd437a59270d, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2019.03.07 12:54:46 +05'30'

(राजेंद्र क्षीरसागर)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४
६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

७. महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर

८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर

९. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जुने जकात घर, शहीद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई

१०. वित्त विभाग, व्यय-९ कार्यासन, मंत्रालय, मुंबई

११. निवडनस्ती, कार्यासन ज-२, महसूल व वन विभाग.